
MH.47
AW.1028
ALFA
Wheat

**प्रेसनोट**

एम.आय.डी.सी.पोस्टे जळगांव
दिनांक- 15/07/2025

प्रति.
दै......................................................., संपादक
जळगांव

विषय- एमआयडीसी परिसरातील व्ही सेक्टर मधील बंद असलेल्या कंपन्यांमध्ये चोरी करणारे आरोपी 04 तासात एमआयडीसी पोलीसांनी घेतले ताब्यात

दिनांक 13/07/2025 रोजी जळगांव शहरातील एमआयडीसी परिसरातील व्ही सेक्टर मधील बंद असलेल्या V-15 या कंपनीतून 18000/- रुपये कि.तीचे तांब्याच्या तारेचे वायरचे रिल व 5600/- रुपये कि.तीचे पॉलीकेब नावाचे पॅकींग असलेले इलेक्ट्रिक वायरचे 7 बंडल, असे व V-130 गौरी पॉलीमर्स या बद कंपनीतुन चटई बनविण्याच्या मशीनचे सुमारे 25000/- रुपये कि.तीचे नवे-जुने स्पेअर पार्ट असा एकुण 48600/- रुपये कि.तीची चोरी झाल्या बाबत एमआयडीसी पोस्टे येथे गुरनं 510/2025 BNS कायदा कलम 334(1), 305 A प्रमाणे गुन्हा नोंद झाला होता.

तरी सदर गुन्हा बाबत मा.पोलीस निरीक्षक श्री.बबन आव्हाड यांनी गुन्हे शोध पथकास सदर गुन्हा उघड करणे बाबत सुचना दिल्या. त्या प्रमाणे गुन्हे शोध पथकातील पोउनि राहुल तायडे यांनी गुन्हा घडलेल्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज चेक करणे कामी पोहेकॉ गणेश शिरसाळे, रामकृष्ण पाटील, पोकॉ राहुल रगडे, विशाल कोळी, गणेश ठाकरे, राहुल घेटे व नितीन ठाकुर अशांचे पथक तयार केले.

नेत्रम योजने द्वारे जळगांव एमआयडीसी परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. त्या प्रमाणे वरील पथकातील अंमलदार यांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज व नेत्रम कार्यालय येथील कॅमेरे चेक केले असता दोन अज्ञात महिला ह्या व्ही सेक्टर मधील बंद पडलेल्या कंपनीत वरील वर्णनाचा सामान गोणीत भरुन चोरी करतांना दिसुन आल्या. तसेच घटनास्थळावरील आजुबाजुच्या परिसरातील सीसीटीव्ही चेक केले असता, सदरच्या महिला ह्या चोरी केलेला सामानाच्या गोण्या त्यांच्या साथीदारानी आणलेल्या रिक्षात भरुन घेऊन जातांना दिसुन आले. त्या नुसार सदरची रिक्षाचा नंबर निष्पण करुन व सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसणारा अज्ञात इसम याचे नाव निष्पण करुन त्यास चोरी गेलेल्या मालासह व माल वाहून नेणे कामी वापरण्यात आलेली मालवाहू रिक्षासह ताब्यात घेतले आहे.

ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव इमरान खान सलीम खान भीस्ती उर्फ रेपट्या रा.शाहु नगर, जळगांव असे असुन त्याचे कडे 18000/- रुपये कि.तीचे तांब्याच्या तारेचे 13 रिल, 5600/- रुपये कि.तीचे पॉलीकेब नावाचे पॅकिंग असलेले इलेक्ट्रिक वायरचे 7 बंडल व 25000/- रुपये कि.तीचे चटई मशीनचे नवे-जुने स्पेअर पार्ट असा वरील वर्णनाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस अधिक्षक महेश्वर रेड्डी साहेब यांचे मार्गदर्शनाखाली, मा.अप्पर पोलीस अधिक्षक अशोक नखाते सो. मा.उपविभागीय पोलीस अधिकारी संदिप गावीत सो.व मा.पोलीस निरीक्षक श्री. बबन आव्हाड यांचे सुचना प्रमाणे पोउनि राहुल तायडे,पोहेकॉ गणेश शिरसाळे, पोहेकॉ रामकृष्ण पाटील, पोकॉ राहुल रगडे, विशाल कोळी, गणेश ठाकरे, राहुल घेटे व नितीन ठाकुर यांनी केली असुन सदर गुन्हा उघडकीस आणणे कामी नेत्रमचे पोलीस अंमलदार पोकॉ पंकज खडसे व पोकॉ मुबारक देशमुख यांनी सहकार्य केले आहे. सदर गुन्हाचा पुढील तपास हा पोहेकॉ रामकृष्ण पाटील व पोकॉ नरेंद्र मोरे हे करीत आहे.